# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य,पुणे.
## तळ मजला, जुनी मध्यवर्ती इमारत,पुणे ४११ ००१.

फोन नं.(०२०) २६०५०६४१/२६०५१११० ईमे-ल आयडी -:sceapune@gmail.com


585/9

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-०९/ अखर्चित नि.निधी व उमेदवार अनामत ठेव/8113 /२०१५.
दिनांक 01/10/२०१५.

**वाचावे** : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४

३. इकडील आदेश क्रं.रासनिप्रा/जिल्हासनिअ आदेश/५४९/सन २०१४ दि.१०.१०.२०१४.

४. इकडील आदेश क्रं.रासनिप्रा/तालुका-प्रभाग सनिअ आदेश/५५०/१४ दि.१०.१०.२०१४,समक्रंमाक ५५६/१४ दि.१६.१०.२०१४.

५. इकडील आदेश क्रं.रासनिप्रा/जिसनिअ/अधिकारप्रदान/५६४/सन २०१४ दि.२०.१०.२०१४.

६. इकडील आदेश क्रं.रासनिप्रा/परिश्रमिक/भत्ते/७७५/२०१४ दि.१७.११.२०१४.

७. इकडील आदेश क्रं.रासनिप्रा/अ-ब वर्ग/नि.निधी/परिश्रमिकभत्ते/१०१५/२०१४ दि.०९.१२.२०१४.

८. इकडील आदेश.क्रं.रासनिप्रा/क-ड वर्ग/नि.निधी/१०९५/२०१४ दि.१८.१२.२०१४.

९. इकडील आदेश क्रं.रासनिप्रा/कक्ष-२/मुंबई/डिपॉझीट(ठेव)/परिपत्रक/४७२४/२०१५ दि.२६.०५.२०१५.

१०. इकडील पत्र क्रं.रासनिप्रा/वाढीव निवडणूक खर्च मंजूरी/५११२/२०१५ दि.०९.०६.२०१५.

**प्रस्ताविक** :

ज्याअर्थी,महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) चे तरतुदी अन्वये, सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठीचे व त्यासाठी मतदार याद्या तयार करण्यासाठीचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण यांचे अधिकार हे राज्य शासनाने गठीत केलेल्या 'राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास' प्राप्त आहेत.आणि,

ज्याअर्थी, राज्य शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी उक्त अधिनियमान्वये तयार केलेले व दि.११.०९.२०१४ रोजी अधिसुचित केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ हे अंमलात आले आहेत.आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त वाचावे क्रं.३ व ४ चे आदेशान्वये, प्राधिकरणाने निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणमध्ये पार पाडण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हा/तालुका/प्रभागांसाठी, जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांची नियुक्ती केलेली आहे.आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चा नियम ३(i) मध्ये "निवडणुका घेण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही पदावर असलेल्या राज्य शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्था किंवा कोणत्याही सहकारी संस्थेच्या कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची अशा पदनामासह व कर्तव्यांसह नेमणूक करणे आणि, अशा प्रकारे नेमणूक केलेल्या प्रत्येक अधिका-याने किंवा कर्मचा-याने त्याला नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडणे त्याच्यावर बंधनकारक असेल, ही कर्तव्ये पार पाडण्यात कसूर केल्यास, तो भारतीय दंड संहिता १८६० च्या प्रकरण १० च्या अर्थांतर्गत लोकसेवकाच्या कायदेशीर प्राधिकाराचा अवमान केल्याबद्दल खटला दाखल केला जाण्यासाठी पात्र असेल" अशी तरतुद आहे.आणि,

ज्याअर्थी, प्राधिकरणाने उक्त वाचावे क्रं.५, दिनांक २०.१०.२०१४ चे आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३(i) चे प्राधिकरणाचे अधिकार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत. आणि,

ज्याअर्थी, प्राधिकरणाने उक्त वाचावे क्रं.६,७ व ८ ने नियम ३(vi) चे आदेशान्वये अनुक्रमे 'क', 'अ' व 'ब' आणि 'ड', वर्ग प्रकारच्या सहकारी संस्थांचा निवडणूक निधी निश्चित केला असुन निवडणूक प्रक्रिया पुर्ण झालेनंतर **निवडणूक निधीची रक्कम शिल्लक राहील्यास संस्थेस रेखांकित धनादेशाव्दारे निवडणूक निकालाचे दिनांकापासुन दोन महिन्याचे आत परत करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.** आणि,

ज्याअर्थी, वाचावे क्रं. ९ चे आदेशान्वये निवडणुकीत उमेदवारांच्या अनामतपोटी (डिपॉझीट) जमा होणारी रक्कम संबंधीत पात्र उमेदवारांना मुदतीत परत करावी आणि ज्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त करण्यास पात्र आहे अशा रक्कमा जप्त करुन त्या 'राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, निवडणूक निधी' या नावाने धनाकर्षाव्दारे प्राधिकरणाचे स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा - पुणे मुख्य, येथील खाते क्रं.३४९४४७०३३३८ मध्ये भरणा करणेस कळविले आहे. आणि,

ज्याअर्थी, प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांनी संस्थांच्या निवडणूक निधी हिशोबाचा आढावा घेणेच्या अनुषंगाने केलेल्या पाहणी अहवालावरुन, तसेच प्राधिकरणाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारी/निवेदनावरुन प्राधिकरणाच्या असे निदर्शनास येत आहे की, संबधित जिल्हा/तालुका /प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी संस्थेचे निवडणूकीचे निकाल घोषित होऊन दोन महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतरही, संस्थांच्या निवडणूक जमा-खर्चाचे हिशोब पुर्ण करीत नाहीत, आणि शिल्लक अखर्चित निवडणूक निधीच्या रक्कमा संबधित संस्थेस प्राधिकरणाने निवडणूक नियम ३(vi) अन्वये काढलेल्या आदेशात नमुद विहीत कालावधीत परत करत नाहीत, तसेच निवडणूक निर्णय अधिकारी उमेदवारांची ठेव अनामत रक्कम परत करीत नाहीत व या रक्कमा निवडणूक पुर्ण होऊनही त्यांचेकडेच ठेवतात, त्याचप्रमाणे, उमेदवार ठेव अनामत जप्त केली असल्यास प्राधिकरणाचे वाचावे क्रं.९ वरील आदेशांचे अनुपालन करीत नाहीत, व हयावरुन पर्यायाने निवडणूक नियम ७० अनुसार, दोन्ही कर्तव्ये पार पाडण्यात कसूर करीत आहेत, त्यामुळे उमेदवारांचा तसेच सहकारी संस्थांचा निधी विनाकारण अडकून पडतो व पडलेला आहे, परिणामत: प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन होत असलेचे निदर्शनास येत आहे. तसेच जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक सुरळीतपणे पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसाठी प्राप्त निवडणूक निधी जसजशी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडुन निधीची मागणी होईल, त्याप्रमाणे त्यांचे खात्री अंती निवडणूक निधी त्वरीत वितरीत करणे गरजेचे होते, तथापि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना मागणी प्रमाणे निधी वितरीत केला गेला नसल्याचे सातत्याने निदर्शनास येत आहे. त्यामुळे जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचे निवडणूक निधी खात्यावर मोठया प्रमाणात रक्कमा शिल्लक असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी हिशोब सादर करु शकत नाहीत, परिणामत: जमा-खर्च होऊ शकत नाही, व संस्थेला शिल्लक रक्कमा परत करण्यात विलंब होत आहे. आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३(v) मध्ये "निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विशेष किंवा साधारण आदेश किंवा निर्देश देणे" ची तरतुद आहे. आणि,

त्याअर्थी, प्राधिकरण महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३(v) नुसार पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

-: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम, २०१४ चे नियम ३(v) व प्राधिकरणास याबाबत समर्थ करणाऱ्या प्राप्त अधिकारानुसार, सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत जमा होणारा निवडणूक निधी व उमेदवार ठेव अनामती बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| अ. क्रं. | कृती बिंदु | कार्यवाही पुर्ण करणेचा अंतीम दिनांक | प्राधिकरणास अनुपालन अहवाल सादर करण्याचा अंतीम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी सर्व यांनी या आदेशाच्या दिनांकापर्यंत ज्या संस्थांचा निवडणूक निकाल घोषित होऊन दोन महिन्याचा कालावधी पुर्ण झाला आहे, अशा संस्थांचे निवडणूकीचे जमा-खर्चाचे हिशोब पुर्ण करुन शिल्लक अखर्चित निवडणूक निधीच्या रक्कमा संबधित संस्थेस धनादेशाव्दारे परत करणे. | दि.३१.१०.२०१५ | दि.०५.११.२०१५ |
| २. | या आदेशाच्या दिनांकानंतर, निवडणूक पुर्ण होणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणूक निधीच्या जमाखर्चाचे हिशोब पुर्ण करणे, व शिल्लक अखर्चित निवडणूक निधीच्या रक्कमा संबधित संस्थेस धनादेशाव्दारे परत करणे. | पदाधिकारी निवडीच्या दिनांकापासुन ४५ दिवसांच्या आत. | दरमहा ५ तारखेपर्यंत |
| ३. | या आदेशाच्या दिनांकापर्यंत, ज्या संस्थांचा निवडणूक निकाल घोषित झाला आहे, त्या संस्थांचे निवडणूक प्रक्रिये दरम्यान उमेदवारांकडुन जमा झालेली अनामत ठेव रक्कम निवडणूक निर्णय अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७० अनुसार, संबधित पात्र उमेदवारांना परत करणे. | दि.१५.१०.२०१५ | दि.०५.११.२०१५ |
| ४. | या आदेशाच्या दिनांकापर्यंत, ज्या उमेदवारांची अनामत रक्कम जप्त करण्यास पात्र आहे, अशा उमेदवारांच्या अनामत रक्कमा जप्त करुन त्या प्राधिकरणाच्या उक्त वाचावे क्रं.९ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार वर्ग करणे. | दि.३०.०९. २०१५ | दि.१५.१०.२०१५ |
| ५. | या आदेशाच्या दिनांकानंतर, निवडणूक निकाल घोषित होणार आहेत, त्या संस्थांचे बाबत निवडणूक नियम ७० अनुसार, उमेदवार ठेव अनामत रक्कम पात्र उमेदवारांना परत करणे. अथवा, निवडणूक नियम ७० नुसार जप्तीस पात्र ठरत असल्यास ती प्राधिकरणाच्या उक्त वाचावे क्रं.९ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार वर्ग करणे. | निवडणूक निकालाचे दिनांकापासुन सात दिवसांचे आत. | दरमहा ५ तारखेपर्यंत |
| ६. | या आदेशाचे दिनांकानंतर, ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रीया चालु होणार आहेत, अशा सहकारी संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना जिल्हा/ तालुका /प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी त्यांचेकडील सबंधित संस्थेच्या जमा निवडणूक निधीतुन जसजशी निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडुन निधीच्या मागणी प्रमाणे त्यांचे खात्री अंती निवडणूक निधी वितरीत करणे. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे मागणी नंतर तीन दिवसांचे आत. | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | या आदेशाचे दिनांकापर्यंत, ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रीया पुर्ण झाल्या आहेत, अशा सहकारी संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना जिल्हा/ तालुका /प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी त्यांचेकडील संबंधित संस्थेच्या जमा निवडणूक निधीतुन निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडुन निधीच्या मागणी प्रमाणे त्यांचे खात्री अंती निवडणूक निधी वितरीत करणे. | या आदेशाचे दिनांकापासुन तीन दिवसांचे आत. | |
| ८. | या आदेशाच्या दिनांकापर्यंत, ज्या संस्थाची निवडणूक प्रक्रीया पुर्ण झाली आहे. त्या संस्थांबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्राधिकरणाचे पत्र दि.०९.०६.२०१५अन्वये नमुद केले प्रमाणे विवरणपत्रासह, विवरणपत्रातील बाबनिहाय, अनुक्रमांकाने देयकांचे प्रमाणित प्रतीसह निवडणूक खर्चाचा हिशोब जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करणे. व त्यांनी प्राधिकरणास सादर करणे. | दि.३१.१०.२०१५ पर्यंत | |
| ९. | या आदेशाच्या दिनांकानंतर, ज्या संस्थाची निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईल, त्या संस्थांबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्राधिकरणाचे पत्र दि.०९.०६.२०१५अन्वये नमुद केले प्रमाणे विवरणपत्रासह, विवरणपत्रातील बाबनिहाय, अनुक्रमांकाने देयकांचे प्रमाणित प्रतीसह निवडणूक खर्चाचा हिशोब जिल्हा/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करणे. | पदाधिकारी निवडीचे दिनांकापासुन पंधरा दिवसांचे आत. | |

या आदेशाचे ज्या जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडुन उल्लंघन होईल ते जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी उचित कारवाईस पात्र ठरतील.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेशानुसार व मान्यतेने,**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रति :-

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**प्रत सस्नेह सवाना :-**

१. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. मा.संचालक, हातमाग,यंत्रमाग वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. मा.आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य,अब्दुल गफार खान मार्ग,वरळी सी फेस, मुंबई.
५. मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे.